# राजनीती

## विषय विवेचन

### 1. राजनीती !

छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे आद्य जनक होत. त्यांनी केलेल्या राज्यव्यवस्थेतून म्हणजेच त्यांच्या एकूण प्रशासनाच्या कामगिरीतून त्यांची थोरवी स्पष्ट होतेच. मुस्लिम राजकर्त्यांच्या भयंकर जुलुमामुळे मेटाकुटीस आलेल्या मराठी रयतेला स्वराज्याचा कानमंत्र देऊन त्यांना संघटित करून स्वराज्य निर्माण करण्याची प्रेरणा शिवरायांनी दिली. रामचंद्रपंत अमात्य असे म्हणतात की, शिवछत्रपती नूतन सृष्टीच निर्माण केली. स्वराज्याची उभारणी केल्यावर ते कसे टिकेल आणि ते आदर्श राज्य कसे बनेल यासंबंधीचे त्यांचे विचार आज्ञापत्र या ग्रंथात स्पष्टपणे दिसून येते.

शिवाजी राजांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मराठी राज्यास या नावाने ओळखले जाते. त्यांच्या स्वराज्यात मिळेल असा भूप्रदेश येथे या स्वराज्याचे खास वैशिष्ट्ये म्हणजे ते एका भक्कम प्रशासन व्यवस्थेवर आधारलेले होते. महाराष्ट्राच्या 1674 मधील राज्याभिषेकाच्या वेळी स्वराज्याचा कारभार वास्तवता आणि वचनपूर्तीस पोचला होता. स्वराज्याच्या कारभाराचा विचार करता प्रजेच्या कल्याणाचा विचार त्यांचे प्रजेशी असलेल्या संबंधावरून स्पष्ट होतो. त्यांच्या प्रजेच्या कल्याणाचा हेतू त्यांच्या पुढील स राजमुद्रेतून प्रतिबिंबीत होतो.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

याचा अर्थ शहाजीचा पुत्र जो शिवाजी त्याची ही मुद्रा आहे. प्रतिपदेच्या चंद्रलेखेप्रमाणे (दिवसेंदिवस) वाढत जाणारी व विश्वातील सर्वांना मान्य होणारी ही मुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी शोभत आहे. या राजमुद्रेतून सर्वांचे कल्याण साधन हे शिवाजी राजांचे ध्येय स्पष्टपणे व्यक्त होताना दिसते. हे राज्य सर्वांच्या आनंदासाठी आणि कल्याणासाठी आहे. राज्याच्या राजमुद्रेतून स्वराज्यस्थापनेचे ध्येयवादाचे आणि त्यांच्या चारित्र्याचे सार स्पष्टपणे प्रतिबिंबीत होताना दिसते.

GoodLuck Page No.
Date

## • स्वराज्य स्थापनेमागील उद्देश :

शिवरायांनी मुख्य कामगिरी म्हणजे स्वराज्य स्थापन करून त्यांनी रयतेत स्वातंत्र्याची प्रखर भावना निर्माण केली. आपल्या लोकांना संघटित करून स्वतंत्र राज्य निर्माण करून लोकांचा राजा बनून कार्य केले. स्वराज्य स्थापनेमागील प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे.

### 1) स्वतंत्र राज्य स्थापनेची कल्पना :-

मुसलमानांच्या सत्तांच्या स्वाऱ्यांनी दक्षिणेतील यादव राजांची राजवट नष्ट केली. विजयनगरचे साम्राज्य बुडविले. मुस्लीम सत्तेने आपले राजकीय प्रभुत्व स्थापन केले. परिणामी महाराष्ट्रात निजामशहा आणि आदिलशहा यांचे वर्चस्व निर्माण झाले मराठा सरदार मुसलमानी सेवा-चाकरी करून जहागिर, वतने मिळवण्यात धन्यता मानू लागले. अशा परिस्थितीत आपल्या भूप्रदेशावरील इस्लामी सत्तेचे वर्चस्व झुगारून देऊन आपल्या लोकांचे स्वतंत्र्य स्वराज्य निर्माण करण्याचा विचार केला व स्वतंत्र्य राज्याची स्थापना महाराजांनी केली.

### 2) धर्म रक्षणासाठी स्वराज्याची गरज :

महाराष्ट्रातील प्रजा सोशीक वृत्तीची होती देव फोडणाऱ्या यवनांनी मराठ्यांना सतावून सोडले होते. धर्म भ्रष्ट करणाऱ्या, गाई मारणाऱ्या आणि ब्राम्हणांचा ~~छळ छळ~~ करणाऱ्या यवनी सत्तेबाबत प्रजेच्या मनात द्वेषभावना वाढत होती. यवनांचा नाश करणे एवढाच शिवरायांचा उद्देश नव्हता. धर्म रक्षणासाठी स्वराज्य स्थापन करण्याचा महत्त्वाचा उद्देश होता.

### 3) मराठ्यांच्या एकीकरण व नेतृत्वाची कल्पना :

स्वराज्य स्थापन करण्यासाठी महाराजांनी मराठ्यांचे एकीकरण करून त्यांचे पुढारपण स्वीकारण्याची गरज वाटू लागली. इतिहासचार्य वि.का. राजवाडे म्हणतात बहुत लोक मेळवून एक एक विचार भरतात. शिवाय स्वराज्यस्थापनेची तयारी होत नाही व एवढेच करून भागत नाही. तर एक विचाराने भारलेल्या लोकांचे पुढारपण पत्करण्यास व ते पत्करून तडीस नेण्यासाठी महापुरुषांनी सिद्ध व्हावे लागते.

### 4) रयतेच्या कल्याणाचा दृष्टीकोन :-

शिवरायांच्या स्वराज्याच्या कारभाराचे वैशिष्ट्य म्हणजे ते एका भक्कम प्रशासन व्यवस्थेवर आधारित होते. त्यांच्या राज्याभिषेकसमयी स्वराज्याचा कारभार वास्तवता आणि वचनपूर्तीस पोहचला होता. राज्यकारभार करताना प्रजेच्या कल्याणाचा विचार त्यांच्या मनी होता. ते नेहमी आपला कारभार हा प्रजेच्या हितासाठी असावा म्हणून दक्ष असत.

Scanned by CamScanner

5] लोकाभिमुख राज्यकारभार :-

मुघल आणि आदिलशाही राजवटीत महाराष्ट्राची परिस्थिती चांगली नव्हती म्हणून शिवाजी राजांनी स्वराज्य स्थापन करून लोकाभिमुख राज्यकारभाराचे सुत्र सांगितले हे तत्कालीन संतांच्या वाङमयातून दिसून येते. याबाबत समर्थ रामदास स्वामी म्हणतात.

किल्येक अनाचारी पीडीला । किल्येक चालेभ्रष्ट झाली ।
किल्येक आलमदली । मुले बाळ ।।

6] रयतेचे आणि त्यांच्या संपत्तीच्या आरक्षणाचा हेतु :

शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांना दिलेल्या सत सुचनेवरून त्यांच्याठायी संपत्तीचे रक्षण करण्याचा हेतू दिसून येतो. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये. असे केल्यास लोकांना वाटे मराठ्यांपेक्षा मूघल बरे.

वरील काही उद्देश लक्षात घेऊन महाराजांनी मराठ्यांच्या स्वतंत्र ~~राहण्याची~~ राज्याची म्हणजेच स्वराज्याची स्थापना केली. मावळ खोऱ्यातील मावळ्यांना एकत्रित करून त्यांचे नेतृत्व केले. त्याठायी एकता स्वाभिमान जागृत करून प्रजाहितदक्ष कारभार सुरु केला. शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या या स्वराज्य कल्पनेचा विचार केल्यास आजच्या राज्यकारभाराची आपणास कल्पना येवू शकते.

• अष्टप्रधान :

शिवाजी महाराजांच्या राज्य कारभाराचे खास वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी निर्माण केलेले अष्टप्रधान मंडळ होय. अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीचा इतिहास सन 1640 पर्यंत मागे जातो. शहाजी राजांनी बंगलोरहून शिवाजी राजे आणि जिजाऊंनी पुण्याच्या जहागिरीचा कारभार करण्यासाठी रवानगी करतेवेळी पेशवा म्हणून शामराव निळकंठ, डबीर म्हणून सेनापत, मुजुमदार म्हणून बाळकृष्ण हणमंते यांची नेमणूक केली. त्यावेळी दादाजी कोंडदेव यांना मुख्य कारभारी म्हणून पाठविले. पुढे दादाजी कोंडदेव यांच्या मृत्युनंतर तुकोजी चोर यांना सेनापतीपद दिले. पुढे महाराजांच्या राज्याभिषेक समयी अष्टप्रधान मंडळ पूर्णत्वास दिले.

Date

- **अष्टप्रधान मंडळ आणि त्यांची नावे:**

| मुख्य पदांचे नाव | प्रधानाचे नाव |
|---|---|
| 1) मुख्य प्रधान (पेशवा) | मोरो त्रिंबक (मोरोपंत) |
| 2) अमात्य (मुजुमदार) | नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ |
| 3) सेनापती (सरलष्कर) | हंबीरराव मोहिते |
| 4) सचिव (सुरनीस) | अण्णाजी दत्तो |
| 5) मंत्री (वाकनीस) | दत्ताजी त्रिंबक |
| 6) पंडितराव | रघुनाथपंत |
| 7) सुमंत (डबीर) | ~~रामचंद्रपंत~~ रामचंद्र त्रिंबक |
| 8) न्यायाधीश | ~~रामचंद्र त्रिंबक~~ निराजी रावजी ~~निराजी रावजी~~ |

- **अष्टप्रधान मंडळातील प्रधानांची कार्य आणि कर्तव्ये:**

इतिहाससंशोधक का. ना. साने यांनी सनदापत्रे या पुस्तकात प्रसिद्ध केलेल्या कागदावरून आणि मल्हार रामराव चिटणीस बखरीत अष्टप्रधानांची कार्य आणि कर्तव्ये दिली आहेत.

1) मुख्य प्रधान (पेशवा)

मुख्य प्रधानाने राज्याचा कारभार करावा. राजकारणाचा भार सांभाळावा. युद्धमोहिमेत भाग घ्यावा. सतत प्रदेश विस्तार करावा. छत्रपतींनी नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करावा. राजांच्या राजपत्रावर मुद्रा उठवावी. इतर प्रधानांच्या बरोबर बुद्धीने वागावे. राजांची सेवा कोणत्याही स्वार्थाला बळी न पडता निरपेक्षवृत्तीने करावी.

2) अमात्य (मुजुमदार):

राज्याच्या जमाखर्च पाहून ते तपासून राजासमोर ठेवावा. राजांच्या आज्ञापत्रावर, राज्य आणि महालांच्या जमाखर्चावर आपली मुद्रा ~~ठेवावी~~ उठवावी. त्याचप्रमाणे छत्रपतींना नेमून दिलेल्या बाबींचा कारभार करावा.

3) सेनापती (सरलष्कर)

आपल्या लष्करातील सैनिकांचा पगार वेळेवर करावा. युद्धमोहिमेत बहादुरी गाजवणाऱ्या छत्रपतींच्याकडून गौरव करून त्यांना यथोचित मानसन्मान बक्षिसे द्यावीत. फौजेच्या अडीअडचणी भूप्रदेशाचे रक्षण करावे. युद्धमोहिमेत मिळालेल्या लुटीचा हिशेब घ्यावा. सर्व लष्करी अधिकाऱ्यांनी सेनापतीच्या आज्ञा मान्याव्यात.

Date

4) सचिव (सुरनीस)

छत्रपतींचा सर्व पत्रव्यवहार स्वत: पाहला. अशा पत्रावर संमत असे लिहावे. युद्धमोहिमात सहभागी व्हावे. नव्याने जिंकलेल्या मुलुखाचा कारभार पाहावा. हिशोब ठेवावा. त्यावर संमत लिहावे.

5) मंत्री (वाकनीस)

राज्याच्या राजकीय आणि राजनैतिक बाबी पाहण्यात हेरखात्याकडे बारकाईने लक्ष ठेवावे. छत्रपतींच्या दरबारात येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था करावी. राज्याच्या कामगिरीचा वृत्तांत ठेवावा. महाराजांच्या भोजनातील अन्नपदार्थांची तपासणी करावी. युद्ध मोहिमेवर प्रसंग पडल्यास जावे. नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करावा.

6) पंडितराव :

पंडितरावांचा अधिकार धार्मिक बाबींवर चालावा. त्यांच्याकडे धार्मिक कज्जांचा धर्म-अधर्म पाहून निकाल द्यावा. अपराध्यास योग्य शिक्षा करावी. सामाजिक रूढी-परंपरा, प्रायश्चित यासंबंधीच्या राजपत्रावर संमतीदर्शक मुद्रा उमटवावी. जेव्हा जेव्हा यज्ञ-याग, शांती, अनुष्ठाने करण्याची गरज वाटल्यास राजाच्या अनुमतीने पार पाडावीत.

7) सुमंत (डबीर)

सुमंत याने परराष्ट्रीय धोरण पहावे. परकीय राजकारणावर लक्ष ठेवावे. परकीय वकील दरबारात आल्यावर त्याचे यथायोग्य स्वागत करून त्यांची उत्तम व्यवस्था ठेवावी. परराज्यातील चालू राजकारण राजाच्या निदर्शनास आणावे. राजाच्या संमतीने धोरण आखावे. प्रसंगी युद्धमोहिमा करण्यात. राजपत्रावर संमतीचे चिन्ह उठवावे.

8) न्यायाधीश:

सर्व प्रकारच्या खटल्यावर न्यायाधीशाचा अधिकार चाले. नि:पक्षपातीपणाने न्याय द्यावा. ब्रम्हसभेच्या न्यायदानावर लक्ष ठेवावे. प्रमुख खटल्यांच्या निकालपत्रावर संमत असे चिन्हे करावे.

Scanned by CamScanner

## अष्टप्रधान मंडळ पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये

1) अष्टप्रधानांतील पदे वंशपरंपरागत नसत:

महाराजांनी कोणत्याही परिस्थितीत अष्टप्रधान मंडळातील कोणासही वंशपरंपरेनी पद दिले नाही. जोपर्यंत प्रधान हा गुणवान, कार्यक्षम आणि सचोटीने युक्त असेल तोपर्यंत त्यास पदावर ठेवत. परिणामी अशा प्रधानाकडून मोठे कार्य होत असे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे सेनापती प्रतापराव गुजरचे होय. स्वराज्याच्या रक्षणासाठी प्रतापरावांनी रणांगणावर देह ठेवला महाराजांच्या मनात त्याबद्दल प्रेम होते तरीही सेनापतीपद त्यांच्या मुलास न देता ते हंबीरराव मोहिते यांना दिले.

2) वतन, जहागीरे न देता रोख पगाराचे धोरण:

शिवरायांनी कोणत्याही प्रधानास वतन अथवा जहागीर देऊ केली नाही. कारण जहागीर देण्याने केंद्रसत्ता दुबळी बनून ती नाहीशी होती. हे त्यांनी ओळखले होते. त्यातूनच एखादा जहागीरदार बलवान होऊन स्वतंत्र राज्य निर्माण करतो. त्यामुळे आपल्या राज्यास धोका होईल म्हणून त्यांना महाराजांनी रोख पगार देण्याची व्यवस्था केली. पुढे शाहू छत्रपतींच्या काळात जहागीरी देण्याचे तत्व स्वीकारले. शिवरायांच्या राजवटीत एकाही प्रधानाला आपल्या घराण्याची स्थापना करता आली नाही.

3) अकार्यक्षम मंत्र्यांना कायम पद न देण्याचे धोरण:

शिवछत्रपतींनी कर्तबगार, कार्यक्षम मंत्र्यांच्या पदास हात लावला नाही पण त्यांना अकार्यक्षम वाटलेल्या मंत्र्यांना पदावरून दूर करण्यास मागेपुढे पाहिले नाही. तुकोजी चोर आणि माणकोजी दहातोंडे यांना सेनापती पदावर फार काळ राहू दिले नाही. सेनापती नेताजी पालकर उद्धटपणे महाराजांशी वागल्याने त्यांनी त्यास मंत्रीपदावरून दूर केले. तीच परिस्थिती इतर प्रधानांची.

4) प्रधानांच्याकडे लष्करी सेवा:

अष्टप्रधान मंडळात स्वतंत्र सेनापती पद असून त्याने सैन्याची उभारणी करणे व सैन्याचे नेतृत्व करावयाचे होते. असे असूनही पंडितराव आणि न्यायाधीश हे दोन मंत्री सोडून उरलेल्या सर्व प्रधानांनी लष्करी मोहिमांचे नेतृत्व करणे सक्तीचे होते. त्याबरोबर आपल्या खात्याकडील छत्रपतींनी दिलेली इतर कामे करावी लागत.

Scanned by CamScanner

5) प्रधानमंडळाचा सल्ला छत्रपतीवर बंधनकारक नसे:

अष्टप्रधान मंडळातील प्रधान छत्रपतींना सल्ला देत परंतु हा सल्ला राजाने मागितल्यावर द्यावयाचा होता. तो सल्ला महाराजांनी मान्य केला पाहिजे असे बंधन नव्हते. राजांच्या आज्ञेनुसार प्रधानांनी आपापल्या खात्याचा कारभार पाहावयाचा होता. प्रधानांना नेमण्याचा व पदावरून दुर करण्याचा अधिकार छत्रपतींना होता. सारांश राज्याची सर्व सत्ता छत्रपतींच्या हाती एकवटली होती. असे असून छत्रपतींनी लोककल्याणाचा विचार करूनच कारभार केला.

6) प्रधानांच्या मुलुखाचा कारभार:

अष्टप्रधान मंडळातील प्रधानांना मुलुखांचा कारभार छत्रपती सांगत असत. राज्यकारभाराच्या सोयीसाठी छत्रपतींनी आपल्या राज्याचे चार विभाग पाडले होते. उत्तर कोकणातील मुलुख हे साल्हेर पासून पुण्यापर्यंतचा मुलुखाचा कारभार मोरोपंत पेशवे तर दक्षिण कोकण ते कारवार पर्यंतच्या किनारपट्टीचा कारभार अण्णाजी दत्तो आणि देश आणि धारवाड-कोप्पल पर्यंतच्या मुलुखाचा कारभार दत्ताजीपंत वाकनीस यांच्याकडे सोपविला होता. मात्र छत्रपतींनी तामीळनाडू किनाऱ्यावरील मुलुखाच्या राज्यकारभाराची जबाबदारी हरजी महाडिक या अष्टप्रधान मंडळात नसलेल्या सुभेदारावर सोपविली होती.

7) प्रधानांच्याकडील अधिकाऱ्यांची निवड छत्रपती करत:

प्रधानांना आपल्या खात्याचा कारभार करण्यासाठी अधिकाऱ्यांची निवड महाराज स्वत: करत. अधिकाऱ्यांची निवड करण्याचा कोणताही अधिकार प्रधानांना नव्हता. वर्षातील काहीकाळ प्रधान लष्करी मोहिमेवर अथवा मुलुखाच्या दौऱ्यावर असत. तेव्हा प्रधानाकडे असणाऱ्या प्रदेशाचा कारभार मुतालिक पहात असे. या मुतालिकांची नेमणूक छत्रपतीच करत असत.

8) प्रधानांची संख्या:

छत्रपतींच्या अष्टप्रधान मंडळाची संख्या आठ अशीच नव्हती. महाराजांच्या राज्याभिषेक समयी प्रधानांची संख्या नऊ होती. कारण अमात्य पदावर नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ या बंधूंची नेमणूक केली होती. संभाजी राजांच्या कारकीर्दीत कवी कलश पंडितराव म्हणून काम पाहत होता. पण तो पेशव्यापेक्षा अधिक अधिकाराचा व सामर्थ्याचा बनला. राजाराम महाराजांनी आणखी एक प्रतिनिधी या प्रधानाचे पद निर्माण केले. यावरून अष्टप्रधान म्हणजे आठच प्रधान असे नसल्याचे दिसते.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

९) राज्यकारभाराची संयुक्त जबाबदारी प्रधानांच्यावर.

राज्याच्या मुख्य व महत्वाच्या कागदपत्रावर विशेषता तह, करार, निकालपत्र इ. वर प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत यांच्या मुद्रा असत. यामागे महत्वाचे निर्णयात चूक होऊ नये. असा निर्णय सर्वांच्या नजरेखालून जावा. थोडक्यात त्यांच्यात जबाबदारी वाटावी आणि कारभार कार्यक्षम व्हावा असे दिसते.

१०) प्रधानाचे पगार :

महाराजांनी कोणासही वतन किंवा जहांगीर दिली नाही. प्रधानांनाही रोख पगार देण्याचे तत्व यांनी स्वीकारले. प्रधानास (पेशव्यास) १५ हजार होन, अमात्यास १२ हजार होन इतर प्रधानांना प्रत्येकी १००० होन इतका वर्षाचा पगार दिला जाई. होन हे सोन्याचे नाणे असून त्याचे वजन सुमारे तीन ग्रॅम इतके होते. म्हणजेच शिवाजी महाराजांच्या अधिकाऱ्यांना अत्यंत समाधानकारक वेतन दिले जात होते. राष्ट्रीयवृत्तीने प्रेरित झालेल्या या अधिकाऱ्यांनी कधीही भ्रष्टाचार केल्याचे उदाहरण आढळत नाही.

११) अष्टप्रधान मंडळात ब्राम्हण - मराठा प्रमाण :

शिवाजी राजांच्या अष्टप्रदान मंडळात सात प्रधान ब्राम्हण तर एक प्रधान मराठा जातीतील होता. सेनापती हा मराठा जातीतील असे. कारण क्षत्रियाला शोभणारे कार्य त्याच्या हातून होईल अशी अपेक्षा. ब्राम्हण जातीकडे दरम्यानच्या काळात शिक्षणाची मक्तेदारी होती. ब्राम्हणांना विद्या येत असल्याने त्याचे प्रमाण अधिक दिसते. प्रत्येक जातीतील चांगल्याचा वापर महाराजांनी राज्य वृध्दीसाठी करून घेतला.

डॉ. बाळकृष्ण यांच्यामते अष्टप्रधान मंडळाची तुलना अमेरिकेच्या अध्यक्ष आणि त्यांच्या सचिवांशी करता येईल. छत्रपती शिवाजी राजांच्या प्रमाणे अध्यक्षांस सचिवांची नेमणूक करण्याचा किंवा काढून टाकण्याचा अधिकार होता.

Scanned by CamScanner